
परमेश्वराचा
मार्ग



© 2013 World Missionary Press, Inc. Cover art by Edwin B. Wallace.

# देवानें संपूर्ण सृष्टीस आणि जीवंत प्राण्यांस उत्पन्न केलें. 1

''प्रारंभी देवानें आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली.'' उत्पत्ति 1:1

''कारण आकाशांत व पृथ्वीवर असलेले, दृष्य व अदृष्य असलेलें राजे, अधिपति, सत्ताधीश किंवा अधिकारी असलेले, जे कांही आहे ते सर्व त्याच्यामध्यें निर्माण झालें;........... कलस्सै. पत्र 1:16

''आकाश व पृथ्वी निर्माण **करणा-या** परमेश्वराचा तुम्हांस आर्शिर्वाद असो. स्वर्ग तर परमेश्वराचा आहे; पृथ्वी त्यानें मानवजातीला दिलीं आहे.'' स्रोत्र 115:15-16

ही पृथ्वी परिपक्वत्तेत होती तेंव्हा परमेश्वरानें ह्यांस मानवाच्या हाती सोपून दिली होती. त्यानंतर काय घटना घडली ते या पुस्तकामध्यें वाचून पहा.

# देवानें आम्हांस निर्माण केलें.



मग देव बोलला, आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशीं सदृश असा मानव आपण करु; ......... अवधी पृथ्वी आणि पृथ्वीवर संचार, करणारें सर्व जीव यांवर ते सत्ता चालवितील.'' उत्पत्ति 1:26

''मग परमेश्वर देवानें जमिनीतींल मातीचा मनुष्य घडिला व त्याच्या नाकपुडयांत प्राणवायु फुंकिला; तेंव्हा मनुष्य जीवधारी प्राणी झाला.''
उत्पत्ति 2:7

''मग परमेश्वर देव म्हणाला, मनुष्य एकटा असावा हें बरें नाहीं; तर त्याला अनुरूपसा सहकारी मी निर्माण करीन.''

मग परमेश्वर देवाने आदामांवर गाढ निद्रा आणिली. परमेश्वर देवानें अदामाची फासळीं काढून तिची स्त्री बनविली आणि तिला आदामाकडे नेलें.''
उत्पत्ति 2:18, 21-22

# 4 आदाम आणि हवा यांनी आज्ञा पाळली नाही.



आम्हीं कधींच सैतानाची हाक ऐकु नये.

''परमेश्वर देवानें मनुष्यास एदेन बागेत नेउन त्याची मशागत व 5
राखण करण्यास ठेविलें. तेंव्हा परमेश्वर देवानें आदामाला अशी आज्ञा दिली कीं बागेतील वाटेल त्या झाडाचें फळ यथेच्छ खा; पण ब-या वाईटाचें ज्ञान करून देणा-या झाडाचें फळ खाउ नको; कारण ज्या दिवशी त्याचें फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील.''
उत्पत्ति 2:15-17

सापनें ज्याला दुष्ट किंवा सैतानपण म्हणतात परमेश्वराच्या आज्ञेस तोंड देवुन लबाड बोलला.

''सर्प स्त्रीला म्हणाला, तुम्हीं खरोखर मरणार नाहीं; त्या झाडाचें फळ खाण्यास चागलें, दिसण्यांत मनोहर आणि शहाणपणाच्या प्राप्तीस इष्ट आहे असे त्या स्त्रीला दिसून आलें. तेंव्हा तिनें त्याचे फळ काढून खाल्ले व आपल्या–बरोबर आपल्या पतीसहि तें दिले, व त्यानें ते खाल्ले.''
उत्पत्ति 3:4,6

## 6 आदम आणि हवा जास्त दिवस एदेन बागेंत राहु शकलें नाही.



''यास्तव ज्या भूमींतून त्यास निर्माण केलें होतें तिची लागवड करावी म्हणून परमेश्वर देवानें त्यास एदन बागेतून बाहेर काढुन लाविलें. देवानें मानवांस बाहेर घालविलें आणि जीवनवृक्षाकडे जाणा-चा मार्गाची राखण करण्यासाठीं एदेन बागेच्या पूर्वभागी करूब व गरगर फिरणारी ज्वालारूप तलवार ठेविली.'' उत्पत्ति 3:23, 24

## जेव्हा आदम आणि हवा नें पाप केलें तो दिवस मानव जातीस फारच दु:खाचा दिवस होता.



''एका माणसाच्या द्वारें पाप जगात शिरले आणि पापाच्या द्वारें मरण शिरले, आणि सर्वांनी पाप केल्यामुळें सर्व माणसामध्यें अशा प्रकारें मरण पसरलें.'' रोम. पत्र 5:12

**कांही आठवणी सार्ठी**

प्रत्येक मनुष्य पापी स्वभावामध्येंच जन्मला आणि एकदिवस पापामध्येंच मरणार. कारण मरण पापाद्वारेंच आले आहे. (रोम. पत्र 5:12 वाचा)

**8 देवानें आपल्या योजनेनुसार आमची पापापासून सुटका व्हावी यासाठीं त्यानें आपला एकुलता एक पुत्र पाठविला.**



"तिला पुत्र होईल, **आणि** त्याचें **नाव तूं येशू** असें ठेव, कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापापासून तारील." मत्तय 1:21

मानवांमध्यें गणणा व्हावी यासाठीं
परमेश्वराचा पुत्र प्रभु येशूख्रिस्तानें मानवीरूप धारण केलें.

"कारण ख्रिस्ताच्या ठायींच देवपणाची सर्व पूर्णता मूर्तिमान् वसतें."
कलस्सै. पत्र 2:9

''प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता आणि शब्द दव होता........ आणि शब्द देही झाला आणि त्यानें आम्हांमध्यें वस्ती केली आणि आम्हीं त्याचें गौरव पाहिलें. ते पित्यापासून आलेल्या एकलुत्या एकाचें गौरव असावें असे अनुग्रह व सत्य ह्यानी परिपूर्ण होते.'' योहान 1:1, 14

''हें सर्व अशासाठीं झालें कीं, प्रभूनें संदेष्टयाच्या द्वारें जे सांगितलें हातें ते पूर्ण व्हावें. ते असें—'पहा, कुमारी गर्भवती होईल व तिला पुत्र होईल, आणि त्याला इम्मानुवेल हे नांव देतील;' ह्या नांवाचा अर्थ, 'आम्हां बरोबर देव.'''

''कारण आम्हांसाठीं बाळ जन्मला आहे, आम्हांस पुत्र दिला आहे; त्याच्या खांद्यांवर सत्ता राहील; त्याला अद्भुत मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपति म्हणतील.'' (यशया 9:6)

# यीशू ख्रिस्त आमचा खरा बळी आहे.

''ज्याला पाप ठाउक नव्हते त्याला त्याने तुमच्या आमच्याकरितां पाप असें केलें.......'' (2 रे करिंथ 5:21)



''त्याने पाप केलें नाहीं, आणि त्याच्या मुखांत कपट **आढळलें** नाहीं;'' (1 ले पेत्र 2:22)

मानवाचा कोणताही यज्ञ किंवा दान त्याच्या पापास मिटवू शकत नाही ''कारण बैलाचें व बक-याचें रक्त पापें दूर करण्यांस असमर्थ आहे.'' (इब्री. 10:4)

येशूख्रिस्त देवाचा कोंकरा आहे. ''हा पाहा जगाचें पाप हरण करणारा देवाचा कोंकरा!'' (योहान 1:29)

## आम्हांस वाचविण्यासाठीं येशूख्रिस्तानें आपला प्राण दिला. 11

दुष्ट लोक येशू ख्रिस्ताचा तिरस्कार करीत होते यास्तव त्यांनी त्याला (येशूख्रिस्ताला) लाकड़ी क्रुसखांबांवर ठोकीलें. परंतु परमेश्वराची ही ईच्छा होती की त्याच्या बलिदानाद्वारे तुमचे आणि माझें जीवन पापापासून वाचविलें जावे. येशूने म्हटले, ''कोणि माझ्यापासून घेत नाहीं तर मी होउनच तो देतों मला तो देण्याचा अधिकार आहे व तो परत घेण्याचाहि अधिकार आहे...... (योहान 10:18)

## आम्हीं प्रभु येशूख्रिस्ताच्या रक्ताद्वारे (सोडविलें) गेलों आहोंत.

''सोनें, 'रूपें' अशा नाशवंत वस्तूनी नव्हे, तर निष्कलंक व निर्दोष कोकरा असा जो ख्रिस्त, त्याच्या मूल्यवान रक्तानें तुम्हीं मुक्त झाला आहा.'' (1 ले पेत्र 1:18, 19)

## दुसरा कोणताही बलिदान आमची पातकें मिटवु शकत नाही.

''त्या 'इच्छेनें आपण येशूख्रिस्ताच्या एकदांच झालेल्या 'देहार्पणा'-द्वारे पवित्र केलेलें आहों.'' इब्री 10:10

**12 ''तर आतां त्याच्या रक्तानें नीतिमान् ठरविण्यांत आल्यामुळें आपण विशेष करून त्याच्या द्वारे देवाच्या क्रोधापासून तारलें जाणार आहों.** (रोम. पत्र 5:9)

''हे प्रभु तूं आपल्या राजाधिकारानें येशील तेंव्हां माझी आठवण कर''



अपराध्यापैकी एकानें येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला व त्याचे तारण झाले.

'मी तुला खचित सांगतों, तू आज माझ्याबरोबर सुख-लोकांत असशील.'' (लूक 23:43)

परन्तु दुस-या अपराध्यानें येशू-ख्रिस्तावर विश्वास ठेविला नाही. म्हणून त्याचें तारण झालें नाही.

**''आपण पापी असतांनाच ख्रिस्त आपणासाठीं मरण पावला.''** (रोम. पत्र 5:8)

# जो कोणि ईश्वर पुत्रावर विश्वास ठेवितो ते जीवन प्राप्त करतील.

''देवानें जगावर **एवढी** प्रिती केली कीं त्यानें आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठीं की, जो कोणी **त्याच्यावर** विश्वास ठेवितो **त्याचा** नाश होउ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावें''

(योहान 3:16)

त्यानें आपल्याला अंधाराच्या सत्तेतून **काढून** आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यांत आणून ठेविलें. त्या पुत्राच्या ठायी, खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ति म्हणजे आपल्या पापांची क्षमा आपल्याला मिळाली आहे. (कलस्सै. पत्र 1:13, 14)

# तो उठला आहे!



''देवदूतानें त्या स्त्रीयांस म्हटलें, तुम्हीं **भिउ** नका; वधस्तंभावर खिळलेल्या येशूचा शोध तुम्ही करीत आहां, हे मला ठाउक आहें. तो येथे नाहीं, कारण त्यानें सांगितल्या प्रमाणें तो उठला आहे. या, तो निजला होता ते स्थळ पाहा;'' (मत्तय 28:5,6)

''मी मेलों होतो तरी पहा, मी युगानुयुग जिवंत आहे, आणि मरणाच्या व अधोलोकांच्या किल्ल्या माझ्याजवळ आहेत.'' प्रकटीकरण 1:18

''....मी जिवंत आहें म्हणून तुम्हीहि जिवंत राहाल. (योहान 14:19)

कारण येशूख्रिस्तानें मरणावर विजय मिळविली आहें आणि मरणाची किल्ली त्याच्याजवळ आहे, यासाठीं आम्हांस मरणाचें भय वाटत नाही.

''मला भीति वाटेल तेव्हा मी तुजवर भरंवसा टाकीन. (स्तोत्र 56:3)

(परमेश्वराची प्रतिज्ञायें 46 पानावर पहाणें)

येशूख्रिस्त आपणांस वाचवू शकतो आणि तो तुम्हांसाठीं प्रार्थना देखील करीत आहे. ''पण हा 'युगानुयुग' रहाणारा असल्यामुळें ह्याचें याजकपण अढळ आहे. ह्या मुळें ह्याच्या द्वारें देवाजवळ जाणाऱ्यांना पूर्णपणें तारण्यास हा समर्थ आहे. कारण त्याच्यासाठी मध्यस्थी करण्यांस हा सर्वदा जिवंत आहे.'' (इब्री 7:24,25)

# 16 तुम्हीं आणि आम्हीं सार्वकालीक जीवन मिळवू शकतो.




**आपण कोणता मार्ग निवडत आहांत?**

परमेश्वरा बरोबर सार्व-कालिक **जीवन** व्यत्तित करण्यासाठीं एक मात्र जो **मार्ग** आहे तो केवळ येशूख्रिस्तच आहे.

सैतानाचा मार्ग सार्वकालिक **मृत्यूकडे** जात आहे.

या बालकानें सार्वकालिक जीवनाच्या मार्गाची योग्य निवड केली आहे.

''..... तुम्हीं कोणाची सेवा करणार हें आज ठरवा .....''
(येहाशवा 24:15)

''..... तूं जीवन निवडून घे म्हणजे तू व तुझा वंश जीवंत राहील.''
(अनुवाद 30:19)

येशूख्रिस्त सार्वकालिक जीवनाकडे जाणारा मार्ग आहे.

''आणि तारण दुसऱ्या कोणाकडुन नाही; कारण जेणें करून आपलें तारण होईल असें दुसरे कोणतेंहि नांव आकाशाखालीं मनुष्यामध्यें दिलेलें नाही.'' (प्रेषित 4:12)

''मीच परमेश्वर आहें, माझ्या शिवाय कोणी त्राता नाही.''
(यशया 43:11)

## 18 जर आम्हीं सार्वकालिक जीवनाची ईच्छा करितो तर येशू ख्रिस्तालाच का निवडावे?

1. कारण केवळ येशूख्रिस्तच या जगात आला.

''..... मी तर त्यांना जीवन प्राप्ति व्हावी व ती विपुलपणें व्हावी म्हणून आलों आहे.'' (योहान 10:10)



2. केवळ येशूख्रिस्तानेंच आम्हांवर प्रिती केली आणि आम्हांसाठीं त्याने प्राण दिला.

''..... देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या योगाने आहे; त्यानें माझ्यावर प्रीति केली व स्वतःला माझ्या करिता दिलें.'' गलती पत्र 2:20

येशूख्रिस्तानें रक्त आणि पाणी असलेल्या मानवाच रूप धारण केले. ''ज्या अर्थी 'मुलें'

एकाच रक्तमांसाची होती त्या अर्थी तोहि 
त्यांच्या सारखा रक्तमांसाचा झाला; हेतु हा की, मरणावर सत्ता गाजविणारा म्हणजे सैतान, ह्याला मरणानें शून्यवत करावें. आणि जे मरणाच्या भयाने आयुष्यभर दास्याच्या बंधनांत होते त्या सर्वांना मुक्त करावे. (इब्री 2:14-15)

3. केवळ येशूख्रिस्ताचे रक्त आमच्या पातकांची सुटका करू शकते.

''..... कारण जिवाबद्दल प्रायश्चित रक्तानेंच होते''
(लेवीय 17:11)

''..... त्याचा पुत्र येशू ह्याचें रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करितें.'' 1 ते योहान 1:7

''खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ति म्हणजे आपल्या पापांची क्षमा आपल्याला मिळाली आहे.'' (कलस्सै. पत्र 1:14)



## 4. केवळ येशूखिस्तच मरणातून उठला.

''आपणांस ठाउक आहे कीं, मेलेल्यातून उठलेला खिस्त ह्या पुढें मरण पावत नाहीं; त्याच्यावर ह्यापुढें मरणाची सत्ता चालत नाही.'' (रोम. पत्र 6:9)

''आणि तो सर्वांसाठीं ह्या करिता मेला की जे जगतात त्यानी पुढें स्वतः करितां नव्हे तर त्यांच्यासाठीं जो मेला व पुन्हा उठला त्याच्याकरिता जगावें.'' (2 रें करिंथ 5:15)

येशूनें म्हटले, ''मी जिवंत आहे म्हणून तुम्हीहि जिवंत रहाल.'' (योहान 14:19)

5. आम्हांस प्रभु येशूखिस्ताचा पवित्र आत्मा मिळाला पाहिजे ज्या द्वारे आम्हांस सार्वकालीक जीवन मिळू शकेल.

''..... जो खिस्त तुम्हांमध्ये आहे तो ते रहस्य आहे.'' (कलस्सै. पत्र 1:27)

ज्यानें येशूला मेलेल्यातून उठविलें, त्याचा आत्मा जर तुम्हांमध्ये वसति करितो, तर ज्यानें खिस्त येशूला मेलेल्यातून उठविलें तो तुम्हांमध्यें वसति करणाऱ्या आपल्या आत्म्यानें तुमचीं मर्त्य शरीरेंहि जिवंत करील.'' रोम. पत्र 8:11

विश्वास ठेवा **कीं** येशूखिस्ताचा आत्मा आम्हांमध्ये वस्ती करतो किंवा रहातो.

''..... जर कोणाला खिस्ताचा आत्मा प्राप्त झालेला नसेल तर तो खिस्ताचा नाहीं.'' (रोम. पत्र 8:9)

# आपण सार्वकालीक जीवन कसें प्राप्त करू शकाल?

24 पानावर (पृष्ठ)
कृपया लक्ष द्या



".... हें मूल सुद्धा आपल्या कृत्यानी उघड करितें."
(नितिवचन 20:11)

येशूख्रिस्त मजवर प्रिती करतो हें मी जाणतो, आणि पवित्र शास्त्र देखील हें सांगते.

येशूनें तर बाळकांस आपणाजवळ बोलाविलें आणि म्हटलें, बालकास माझ्याजवळ येउं द्या, त्यांस मनाई करूं नका; कारण देवाचें राज्य त्यांच्या सारख्याचेंच आहे.'' लूक 18:16

''तसें ह्या लहानांतील एकाचाहि नाश व्हावा अशी तुमच्या स्वर्गातील पित्याची इच्छा नाही.'' (मत्तय 18:14)

आपण कोण आहात आणि कोठें राहाता  हा विषय नाही तर प्रभु येशूख्रिस्त तुम्हांवर प्रिती करितो तो तुमच्या करितां मरण पावला, येशूख्रिस्त देखील तुमच्या प्रेमाची आपेक्षा करतो. आपण आपलें प्रेम त्याच्या आज्ञा पाळण्यांच्या द्वारें प्रगट करूं शकतो.

''माझ्यावर तुमची प्रीति असलीं तर तुम्हीं माझ्या आज्ञा पाळाल.'' योहान 14:15

## 24 आपण परमेश्वराचा मार्ग कसें प्राप्त करूं शकता ?

1. जर आपण स्वीकार कराल कीं मी एक पापी मनुष्य आहे. (परमेश्वराची आज्ञा मानणे)

''कारण सर्वांनीं पाप केलें आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणें पडलें आहेंत.'' (रोम. पत्र 3:23)

2. येशूखिस्ता द्वारें परमेश्वराजवळ या.

''कारण एकच देव आहें, आणि देव व मानव ह्यामध्यें खिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे. (1 ले तिमोथी 2:5)

''ह्यामुळें ह्याच्या द्वारें देवाजवळ जाणा-यांना पूर्णपणें तारण्यास हा समर्थ आहे; कारण त्यांच्यासाठीं मध्यस्थी करण्यास हा सर्वदा जिवंत आहे.'' (इब्री 7:25)

येशूनें म्हटलें, ''..... जो माझ्याकडें येतो त्याला मी मुळींच घालवून देणार नाहीं.'' (योहान 6:37)

## 3. आपण आपल्या पापांचा स्वीकार करा.



(याचा अर्थ असा आहे की आपण आपल्या पापांची क्षमा मागणे)

''तेंव्हा तुमचीं पापें पुसून टाकिलीं जावीं म्हणून पश्चाताप करा व वळा. अशासाठीं कीं विश्वांतीचें समय प्रभुजवळून यावे.'' (प्रेषित 3:19)

''..... ज्याला विलंब म्हणून म्हणतात तसा विलंब प्रभु आपल्या वचनाविषयी करीत नाही, तर तो तुमचें घीरानें सहन करितो. कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही, तर सर्वांनी पश्चाताप करावा अशी आहे.'' (2रे पेत्र 3:9)

4. अपल्या पापांचा अंगीकार करा. (किंवा स्वीकार करा)



**''जर आपण आपलीं पापें पदरी घेतली, तर तो आपल्या पापांची क्षमा करील''**

(1ले योहान 1:9)

**26 खाली दिलेल्या ओळीमध्यें 1लें योहान 1:9 ची वचनें जी पानावर प्रार्थना करणा-या हातांवर लिहलें आहे लिहा.**

__________________________________________________

__________________________________________________

__________________________________________________

__________________________________________________

**5.** आपल्या पापांना सोडून द्या.
(सोडणे म्हणजे त्यागणे)

''जो आपलें दोष झाकितो त्याचें बरें होत नाहीं; जो ते कबूल करून सोडून देतो त्याजवर दया होते.'' (नीतिवचन 28:13)

''वाईटापासून दूर राहा, बरें तें कर.
म्हणजें तुझी वस्ती कायमची राहील.'' (स्तोत्र 37:27)



## 6. येशूख्रिस्तावर विश्वास ठेवा.

''की येशू प्रभु आहे असें जर तू आपल्या मुखानें कबूल करशील आणि....... आपल्या अंत:करणात विश्वास ठेवशील तर तुझें तारण होईल.'' (रोम. पत्र 10:9)

''कारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारें तुमचें तारण झाले आहे. कोणी गर्व करू नये की कर्म केल्यानें हें झाली नाही.'' (इफिस पत्र 2:8-9)

''तें म्हणालें, प्रभ येशूवर विश्वास ठेव, म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचें तारण होईल.'' (प्रेषित 16:31)

## 7. येशूख्रिस्ताला आपल्या हृदयात आणि जीवनामध्यें स्वीकार करा.

आपण केवळ आपल्या हृदयाचें द्वार उघडून येशूला आत येण्यांस आमंत्रण करूं शकता. येशूने म्हटलें, ''पाहा, मी दाराशी उभा आहे व दार ठोकीत आहे; जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ आंत जाईन व त्याच्या बरोबर जेवीन, आणि तो माझ्याबरोबर जेवील.'' (प्रकटीकरण 3:20)



''परंतु जितक्यानीं त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणा-यांना त्यानें देवाची मुलें ह्रोण्याचा अधिकार दिला.''(योहान 1:12)

# एक प्रार्थना

आपण या पूर्वी कधींच प्रार्थना केली नसेल पण आता प्रार्थना करण्यासाठीं साहाय्य हवे आहे तर खाली दिलेली प्रार्थना एक मार्गदर्शणाची प्रार्थना आहें असें स्वीकार करूं शकता.



प्रिय प्रभु येशू,

मी तुझी उपकार स्तुती करतो कारण तूं माझ्या पापांसाठीं त्या क्रुस खांबावर बलिदान झालास. मी माझ्या सर्व पापांसाठीं तुजकडे क्षमा मागत आहें. तू माझ्या हृदयामध्यें ऐ आणि सदैव निवास कर. मी पूर्णपणें विश्वास करतो कीं आज माझ्या अशुध्द हृदयास शुद्ध केलें आहे. मी तुला माझा तारणारा परमेश्वर आहेस म्हपून स्वीकारीतो.

येशूख्रिस्ताच्या नावांनें मागतो, 'आमेन.'

## जर येशूखिस्त आमच्या हृदयात आहे तर आपण सुरिक्षत आहोत.

''..... देवानें आपल्याला सार्वकालिक जीवन दिलें आणि हें जीवन त्याच्या पुत्राच्या ठायी आहे. ..... ज्याला देवाचा पुत्र लाभला आहें त्याला जीवन लाभलें आहे; .......'' 1 लें योहान 5:11,12

''..... जो माझे वचन ऐकतो आणि ज्यानें मला पाठविलें त्याच्यावर विश्वास ठेवितो......... तो मरणातून जीवनांत पार गेला आहे.'' (योहान 5:24)

''..... आणि शरिरापासून दूर जाउन प्रभुसह गृहवास करणें हें आम्हांस अधिक बरें वाटतें.'' (2 रें करिंथ 5:8)

''..... गौरवाची आशा असा जो खिस्त तुम्हांमध्यें आहें तो ते रहस्य आहें.'' (कलस्सै. पत्र 1:27)

जर आपण आपल्या पापांची क्षमा प्रभु येशूखिस्ता जवळ मागितली आहे आणि तुमचा विश्वास आहें की प्रभु येशूखिस्तच माझा तारणारा आहे तर खाली आपलें नांव लिहा.

---

# आपण येशूख्रिस्ताचें अनुसरण कोणत्या प्रकारें करूं शकता?





पवित्रशास्त्रातील वचनें लक्ष देवुन रोज वाचन कराल आणि त्यावर मनन कराल तर तुमची फास्च मदत होईल (या छोटया पुस्तकामध्यें पुष्कळशी अशी वचनें आहेंत)

"प्रत्येक परमेश्वरप्रेरित शास्त्रलेख सद्‌बोध, दोष दाखविणें, सुधारणूक, निितिशिक्षण ह्या करीता उपयोगी आहे." (2रे तिमोथी 3:16)

# 32 प्रार्थनें द्वारे येशूख्रिस्ता बरोबर केंव्हाही आपण बोलू शकता.



आपल्या जीवनांमध्यें प्रत्येक चांगल्या गोष्टीसाठीं किंवा कार्यासाठीं उपकारस्तुती करण्यास विसरू नका. आमच्या आत्म्याचें सरक्षण करण्यासाठीं धन्यवाद करीत जा. आपल्या कोणत्याही गरजेसाठीं येशूख्रिस्ताच्या नावांनें प्रार्थना करीत जा.

''........ आपण त्याच्या इच्छेप्रमाणें कांही मागितलें तर तो आपलें ऐकेल.'' (1 लें योहान 5:14)

''..... तुम्हीं पित्याजवळ कांही मागाल तर तो तें तुम्हांस माझ्या नावानें देईल.'' (योहान 16:23)

''..... एकमेका साठीं प्रार्थना करा.....'' (याकोब पत्र 5:16)

''..... तुम्हीं आपल्या वै-यावर प्रीति करा आणि जे तुमचा छळ करितात त्यांच्यासाठीं प्रार्थना करा'' (मत्तय 5:44)

(शिष्य याचा अर्थ जो येशूच्या पाठीमागे चालणारा)

येशूनें आपल्या शिष्यास म्हटलें की जेव्हा तुम्हीं प्रार्थना कराल तर ह्यास्तव तुम्हीं प्रार्थना करा.

''हे आमच्या स्वर्गातील पित्या, तुझें नाव पवित्र मानिलें जावो. तुझे राज्य येवो. जसें स्वर्गात तसें पृथ्वीवरीह तुझ्या इच्छेप्रमाणें व्होवो. आमची रोजची भाकर आज आम्हास दे; आणि जसें आम्हीं आपल्या ऋण्यांस ऋण सोडिलें आहे तशी तूं आपची ऋणें आम्हांस सोड. आणि आम्हांस परिक्षेंत आणं नको; तर आम्हांस वाईटापासून सोडीव. कारण की राज्य, सामर्थ्य आणि गौरव, ही सर्वकाळ तुझी आहेत;'' (मत्तय 6:9-13)

या प्रार्थनेंस आठवण करा. विश्वासीजण बसून ही प्रार्थना बोलतात.

# परमेश्वराच्या दहा आज्ञा.
# आम्हीं कसें जीवन जगावे हे शिकवते.
(निर्गमन अध्याय 20)

चार आज्ञां परमेश्वरावरील प्रेमा संबधीत आहे.

1. माझ्या समोर तुला अन्य देव नसावे.
2. आपल्यासाठीं कोरीव मूर्ति करूं नको; ...... त्याच्या पाया पडूं नको किंवा त्यांची पूजा करू नको.
3. तुझा देव परमेश्वर याचे नाव व्यर्थ घेउ नको.
4. शब्बाथ दिवसाची आठवण ठेवुण तो पवित्रपणें पाळ.

**शेवटाल्या सहा आज्ञा मानवाच्या प्रेमा संबधीत आहे.** 

5. आपल्या आई बापाचा मान राख.
6. खून करू नको.
7. व्यभिचार करू नको.
8. चोरी करूं नको.
9. आपल्या **शेजा-या** विरुद्ध खोटी साक्ष देउं नको.
10. आपल्या **शेजा**-याच्या घराची अभिलाषा करूं नको.

**परमेश्वराच्या आज्ञा पाळण्यानें तुमच्या प्रार्थनेच उत्तर मिळेल.**

''आणि आपण जें काहीं मागतों तें त्याच्या पासून आपल्याला मिळते, कारण आपण त्याच्या आज्ञा पाळितों, व त्याला जे आवडतें तें करितो.''

(1 लें योहान 3:22)

# दोन सर्वात मोठया आज्ञां

## परमेश्वरावरील प्रेम.

1. ''तो त्याला म्हणाला, तूं आपला देव परमेश्वर ह्याच्यावर पूर्ण अंतःकरणानें, पूर्ण जिवानें व पूर्ण मनानें प्रीति कर. हीच मोठी व पहिली आज्ञा आहे.'' (मत्तय 22:37, 38)

## मनुष्यावरील प्रेम

2. ''हिच्यासारखी दुसरी ही आहे कीं, तूं आपल्या **शेजा-**यावर स्वतःसारखी प्रीति कर.'' (मत्तय 22:39)




हया सर्व दहा आज्ञांचा सार (34 आणि 35 पानावरील) या दोन मोठया आज्ञामध्येंच आहे.

## प्रीतिचा अध्याय

(1 लें करिंथ पत्र. 13:1-8, 13)

''[1]मी माणसांच्या व देवदूतांच्या भाषांमध्ये बोलत असलों. पण माझ्या ठायीं
प्रीति नसली, तर मी वाजणारी थाळी किंवा झणझणणारी झांज असा आहें.
[2]मला संदेश देण्याची शक्ति असली, मला सर्व गुजें व सर्व विद्या अवगत
असल्या, आणि डोंगर ढळविंता येतील इतका माझा विश्वास असला, पण
माझ्या ठायीं प्रीति नसली, तर मी कांहींच नाहीं. [3]मी आपलें सर्व धन अन्नदानार्थ
दिलें व मी आपलें जिवंत शरीर जाळण्यासाठीं दिलें, पण माझ्या ठायी प्रीति
नसली तर मला कांहीं लाभ नाही. [4]प्रीति सहनशील आहे, परोपकारी आहे;
प्रीति हेवा करीत नाही; प्रीति बढाई मारीत नाही, फुगत नाहीं; [5]ती गैरशिस्त
वागत नाही, स्वार्थ पाहत नाहीं, चित नाही, अपकार स्मरत नाही; [6]ती अनीतींत
आनंद मानीत नाहीं, तर सत्या संबंधी आनंद मानितें;

[7]ती सर्व कांहीं सहन करिते, सर्व कांहीं खरें मानण्यास सिद्ध असते, सर्वांची आशा धरिते सर्वा संबंधानें धीर धरिते. [8]प्रीति कधीं अंतर देत नाहीं; संदेश असलें तरी ती रद्द होतील; भाषा असल्या तरी त्या समाप्त होतील; आणि विद्या असली तरी ती रद्द होईल.
[13]सारांश विश्वास आशा, प्रीति ही तिन्ही टिकणार आहेत; परंतु त्यात प्रीति श्रेष्ठ आहे.''

## परमेश्वर प्रीति आहे.

''..... देव प्रीति आहे; जो प्रीतीमध्यें राहतो तो देवामध्यें राहतो व देव त्याच्यामध्यें राहतो.''

(1 लें योहान 4:16)

# येशूख्रिस्ताची इच्छा आहें की आपण त्याची साक्ष द्यावी.



(घरात, शाळेत आणि इतर कोणत्याही ठिकाणी)

येशूनें म्हटलें, "..... तू आपल्या घरीं स्वकीयांकडे जा; प्रभुनें तुझ्यासाठीं केवढीं मोठीं कामें केलीं व तुझ्यावर कशी दया केली हें त्याना साग." (मार्क 5:19)

## देवाच्या लेंकराची ओळख कशी केली जाते?

''आत्म्याच्याद्वारे निष्पन्न होणारें फळ, प्रीति, आनंद, शांति, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन हें आहें........'' गलती पत्र 5:22-23)

## देवाची लेकरें दुस-यांच्या अपराधांची क्षमा करितात.

**''कारण जर तुम्हीं लोकांना त्यांच्या अपराधांची क्षमा केली तर तुमचा स्वर्गीय पिता तुम्हांलाहि क्षमा करील;''** (मत्तय 6:14)

## सात दुषकृत्यांचा परमेश्वराला वीट येतो.

''उन्मत दृष्टी, लबाड बोलणारी जिव्हा, निर्दोष रक्त पाडणारें हात दुष्ट योजना करणारें पाय, लबाड बोलणारा खोटा साक्षी व भावाभावात वैमनस्य उत्पन्न करणारा मनुष्य.'' (नितिवचन 6:17-19)

## देहाची कर्मे




''देहाचीं कर्मे तर उघड आहेत; ती हीं, जारकर्म अशुद्धपणा कामातुरपणा, मूर्तिपूजा, चेटकें, वैर, कलह, मत्सर, राग, तट, फुटी, पक्षभेद, हेवा, दारूबाजी, रंगेलपणा, ..... अशीं कर्मे करणा-यांना देवाच्या राज्याचें, वतन मिलणार नाहीं.''

(गलती. 5:19-21)

''..... पुरुष संभोग घेणारें.....चोर..... लोभी....चहाड़ व वित्त हरण करणारें ह्यांना देवाच्या राच्याचें वतन मिळजार नाहीं.''

(1 लें करिंथ 6:6:9-10)

## प्रभु येशू आपणांस पवित्र आत्म्यानें पूर्ण आणि शुद्ध करो.

''आणि तुम्हांपैकी कित्येक तसें होते. तरी तुम्हीं प्रभु येशूख्रिस्ताच्या नावांत व आपल्या देवाच्या आत्म्यांत धुतलेंलें, पवित्र केलेले व नीतिमान ठरविलेलें असें झालां.''

(1 लें करिंथ 6:9-10)

# नरक ही एक वास्तविक जागा आहे.




**(वाचा लूक** 16:19-26)

प्रभु येशूख्रिस्तावर विश्वास ठेवा. तो तुमचें नाव जीवनी पुस्तकामध्यें लिहिल.

''ज्या कोणाचें नांव 'जीवनाच्या पुस्तकांत लिहिलेलें सांपडलें नाही'. तो अग्नीच्या सरोवरांत टाकिला गेला.'' प्रकटीकरण 20:15

''..... देवानें आपल्याला सार्वकालिक जीवन दिलें आणि हें जीवन त्याच्या पुत्राच्या ठायी आहे.'' (1लें योहान 5:11)

''कारण पापाचें वेतन मरण आहें, पण देवाचें कृपादान आपल्या प्रभु येशूखिस्तामध्यें सार्वकालिक जीवन आहे.'' (रोम. पत्र 6:23)

''जो पुत्रावर विश्वास ठेवितो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झालें आहे; परंतु जो पुत्राचें ऐकत नाहीं त्याच्या दृष्टींस जीवन पडणार नाही; पण देवांचा क्रोध त्याच्यावर राहतो.'' (योहान 3:36)

येशूने म्हटलें, ''मार्ग, सत्य व जीवन मीच आहें; माझ्याद्वारें आल्यावांचून पित्याकडे कोणी येत नाही.'' (योहान 14:6)

# स्वर्ग एक वास्तविक जागा आहे.



योहानानें प्रगटीकरणाच्या 21 व्या अध्यायामध्यें एक नवें आकाश आणि नविन पृथ्वी याचा दृष्टांत पाहिला.

''तो त्यांच्या **डोळयाचें** सर्व अश्रु पुसून टाकील; **ह्या** पुढें मरण नाही; शोक रडणें व कष्ट हीहि नाहीत; कारण पहिल्या गोष्टी होउन गेल्या. मी सर्व गोष्ठी नवीन करितों तो म्हणाला, लीहि; कारण हीं वचने विश्वासनीय व सत्य आहेत. (प्रकटीकरण 21:4-5)

योहानानें पवित्र नगरांस जो की यरूशलेम स्वर्गातून खाली येत आहें हें पाहिलें. ''.....आणि नगरी शुद्ध कांचेसारखी शुद्ध सोनेंच होती. नगरीच्या तटाचें 'पायें' वेगवेगळ्या **मील्यवान** रत्नांनी शृंगारलेले होते.....'' (प्रकटीकरण 21:18,19)

## जो येशूख्रिस्तावर विश्वास ठेवितो, त्याच्या करिता प्रभु येशूख्रिस्त घर बनविण्यास गेला आहे.

''तुमचें अंतःकरण अस्वस्थ होउं नये; देवावर विश्वास ठेवा आणि माझ्यावरहि विश्वास ठेवा. माझ्या पित्याच्या घरात राहाण्याच्या जागा पुष्कळ आहेत; नसत्या तर मीं तुम्हांला तसें सांगितलें असतें; मीं तुम्हांसाठीं जागा तयार करावयास जातो; ..... तयार केली म्हणजे पुन्हा येउन तुम्हांस आपल्या जवळ घेईन......'' (योहन 14:1-3)

## ही सुवार्ता दुस-यानां देखील सांगा.

येशूनें म्हटलें, ''सर्व जगात जाउन संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करा.'' (मार्क 16:15)

''..... आणि जो ज्ञानी असतो तो जिवांस वश करितो.'' (नीतिवचन 11:30)

# देवाचें आपल्या पुत्राविषयीचें वचन.

''..... मी तुला सोडून जाणार नाहीं व तुला टाकणार नाही.'' इब्री. 13:5

''कारण तुझ्या सर्व मार्गात तुझें रक्षण करण्याची तुजविषयीं तो आपल्या दिव्यदूतांस आज्ञा देईल.'' स्तोत्र 91:11

''..... आणि पित्याच्या हातांतून तें कोणी हिसकून घेउं शकत नाहीं.'' योहान 10:29



''..... आणि पहा, युगाच्या समाप्तीपंत मी सर्व दिवस तुमच्या बरोबर आहें.'' (मत्तय 28:20

''तुला जें कांही सोसावे लागणार आहे त्याचें भय धरूं नकों ..... मरे पर्यंत तूं विश्वासू राहा, म्हणजे मी तुला जीवनाचा मुगुट देईन.'' (प्रकटीकरण 2:10)

''..... मी अंधारात बसलो तरी परमेश्वर मला प्रकाश असा होईल. (मीखा 7:8)

''मला हाक मार म्हणजे मी तुला उत्तर देईन व तुला ठाउक नाहीत अशा मोठ्या व महान शोष्टी तुला सांगेन.'' (यिर्मया 33:3)

प्रत्येक मनुष्य मरणातून उठविला जाईल.

''..... कारण कबरेंतील सर्व माणसें त्याची वाणी ऐकतील आणि ज्यानीं सत्कर्मे केली ते जीवनाच्या पुनरूत्थानासाठीं व ज्यानीं दुष्कर्मे केली ते न्यायाच्या पुनरूत्थानासाठीं बाहेर येतील, अशी वेळ येत आहे.'' (योहान 5:28,29)



*येशूखिस्तामध्यें मृत्यूपावलेलें सर्वप्रथम उठतील.*

''नंतर जिवंत उरलेले आपण त्यांच्या बरोबर प्रभुला सामोरे होण्यासाठीं मेघाखढ असें अंतराळांत घेतलें जाउं, आणि तसेच सदासर्वदा प्रभुजवळ राहूं.'' (1 लें थेस्सलनी पत्र 4:17)

''सावध असा, जागृत राहा; कारण ती वेळ केंव्हा येईल हें तुम्हांला ठाउक नाहीं. (मार्क 13:33)

# येशूख्रिस्ताचें आगमन कसें होईल ?



''पाहा, तो मेघारूढ होईल, प्रत्येक डोळा त्याला 'पाहील', .....'' (प्रकटीकरण 1:7)

## · खोटे ख्रिस्त व खोटे संदेष्टे या पासून सावधान राहा.

''त्या वेळेंस जर कोणी तुम्हांस म्हटले, पाहा, ख्रिस्त येथें आहे किंवा तेथे आहे, तर ते खरें मानूं नका ..... ह्यास्तव कोणी तुम्हांस म्हणतील, पहा, तो अरण्यांत आहे, तर जाउं नका; ...... तो आतल्या खोल्यात आहे, तर तें खरें मानूं नका.'' (मत्तय 24:23-26)

## येशूख्रिस्त लवकरच मेघारूढ होवुन येतील.

''कारण जशी वीज पूर्वेकडून निघून पश्चिमेंपर्यंत चकाकत जाते तसें मनुष्याच्या पुत्राचें येणें होईल..... मग पृथ्वीवरील सर्व जातींचे लोक शोक करितील, आणि ते मनुष्याच्या पुत्राला आकाशातल्या मेघावर आरूढ होउन पराक्रमानें व मोठ्या वैभवानें येतांना पाहातील;'' (मत्तय 24:27,30)

# दाविदाचें स्तोत्र

(स्तोत्रसंहिता 23)

[1]**परमेश्वर माझा मेंढपाळ आहे मला कांहीं उणें पडणार नाहीं.**[2]; तो
मला हिरव्याचार कुरणांत बसवितो; तो मला शांत पाण्याजवळ नेतो.[3]
तो माझा जीव ताजातवाना करितो. तो आपल्या नामास्तव मला नीति
मार्गांनी चालवितो.[4] **मृत्यूच्छायेच्या दरीतूनही मी जात असलों तरी**
**अरिष्ठास भिणार नाही, कारण तूं मजबरोबर आहेस; तुझी आकडी**
**व तुझी काठी मला धीर देतात.**[5] तूं माझ्या शत्रूच्या देखत मजपुढें ताट
वाढितोंस; तूं माझ्या डोक्याला तेलाचा अभ्यंग करितोंस; माझे पात्र
काठोकांठ भरले आहे.[6] खरोखर माझ्या आयुष्याचें सर्व दिवस मला
कल्याण व दया ही लाभतील; आणि परमेश्वराच्या घरांत मी चिरकाल
राहिन.

Published in numerous languages by World Missionary Press, Inc. as God supplies funds in answer to prayer. If you would like more copies for prayerful distribution, specify which language(s) you need and how many booklets.

For more information or to request a free Bible study, please write to:

**WMP India Bible Literature**
**67 Beracah Road**
**Kilpauk, Chennai - 600 010**

Read booklets online or by App
www.wmp-readonline.org



मोफत – विक्रीसाठी नाही

www.wmpress.org

7-17

2235 Marathi WTG